महाराष्ट्र सत्यमेव जयते शासन
# महिला व बाल विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-1.
28 राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे- 411001.
ई-मेल dy.commissionercdc@gmail.com दुरध्वनी क्रमांक 020-26330374

---

जा.क्र. मबाविआ/बावि/का-५/बा.ह.आ.जाहिरात/२०२४-२५/ ४५७५ पुणे दि.१७ जुलै, २०२५

प्रति,

**मा.महासंचालक**
माहिती व जनसंपर्क महासंचालनाय
G.T. हॉस्पीटल समोर, ६वा मजला,
नवीन मंत्रालय इमारत, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई -३२

**विषय :- महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्ती करणेबाबतची जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेबाबत... (महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हे एकुण-३६)**

**संदर्भ:-** १. शासन पत्र क्र. बैठक-२०२५/प्र.क्र.३५/का-९ दिनांक ११/०७/२०२५.
२. आयुक्तालयाचे पत्र क्र. ४५४४, दिनांक १६ जुलै, २०२५.
३. दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी प्रसिध्द जाहिरात.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय क्र. १ च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचनेनुसार संदर्भ क्र. २ च्या आयुक्तालयाच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य निवडीबाबतची जाहिरात सर्वाधिक खापाच्या वर्तमान पत्रामधून प्रसिध्द करणे बाबत विनंती करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने दिनांक १७ जुलै, २०२५ रोजी विषयांकित जाहिरात प्रसिध्द झालेली आहे. तथापि, सदर जाहिरातीच्या पहिल्या परिच्छेदामध्ये अर्ज करण्याची मुदत ०७ दिवस अशी झालेली आहे. तसेच अंतिम परिच्छेदामध्ये सदर मुदत १५ दिवस असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे.

त्याअनुषंगाने आपणांस विनंती करण्यात येते की, सदर जाहिरातीच्या अनुषंगाने सोबत जोडलेले निवेदन उदया दिनांक १८ जुलै, २०२५ रोजी यापुर्वी प्रसिध्द झालेल्या सर्व वर्तमान पत्रामधून **मोफत प्रसिध्द** करण्यात यावे, हि विनंती.

**सोबत :- जाहीर निवेदन**

आपली विश्वासू,

(नयना अर्जुन गुंडे)भा.प्र.से
आयुक्त,
महिला व बाल विकास,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत** - मा.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

# जाहीर निवेदन

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम २००५ च्या कलम १७ व १८ मधील तरतुदीनुसार व बाल हक्क संरक्षण राष्ट्रीय आयोग नियम, २००६ मधील दि.२४/०३/२०१४ व दि.०६/०५/२०१४ च्या दुरुस्तीमध्ये नमूद निकषांचा समावेश करुन महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी राज्यातून नामांकने दिनांक १७.०७.२०२५ रोजीच्या जाहिरातीनुसार मागविण्यात आलेली आहेत. तथापि, सदर विषयाच्या अनुषंगाने प्रसिध्द जाहिरातीमधील पहिल्या परिच्छेदामध्ये ०७ दिवस आणि अंतिम परिच्छेदामध्ये १५ दिवसाच्या आत नामांकने सादर करणे बाबत नमूद करण्यात आलेले आहे.

**त्या ऐवजी खालील प्रमाणे वाचावे.**

दि.०२.०१.२०२५ रोजीच्या जाहिरातीच्या अनुषंगाने ज्यांनी यापुर्वी अर्ज केलेले आहेत, त्यांनी पुन:श्च अर्ज करण्याची आवश्यकता नाही. तसेच जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून कार्यालयीन कामकाजाच्या ७ दिवसांचे आत विहीत नमुन्यात आयुक्त, महिला व बाल विकास, २८ राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, महाराष्ट्र राज्य, पुणे-०१ यांचेकडे नामांकने सादर करण्यात यावीत. असे आवाहन आयुक्त, महिला व बाल विकास श्रीमती नयना अर्जुन गुंडे यांनी केले आहे.